# प्रेस नोट

## दिनांक-१७/०१/२०२५

## हिंजवडी पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस मदत केंद्र,फेज-२ चा उदघाटन कार्यक्रम

पोलीस स्टेशन हददीतील विप्रो सर्कल,फेज-२,परिसरातील आयटी कंपन्या,परिसरामध्ये मोठया प्रमाणात होत असलेल्या रहिवासी सोसायटया तसेच महिला व मुले यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना तात्काळ पोलीस मदत मिळावी यासाठी,ॲम्बेसी टेक-झोन,या कंपनीच्या सहकार्याने पोलीस मदत केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. नमुद पोलीस मदत केंद्राचा आज दिनांक-१७/०१/२०२५ रोजी ११.३० वाजता मा.श्री.विनयकुमार चौबे,पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड यांचे हस्ते,उदघाटन समारंभ कार्यक्रम पार पडला आहे. पोलीस मदत केंद्र याठिकाणी पोलीस स्टाफ हजर असणार असुन फेज-२ भागात पोलीसांची सतत गस्त असणार आहे.त्यामुळे कंपनी स्टाफ व परिसराती नागरिकांना त्यांच्या अडचणी तात्काळ सोडविण्यासाठी मदत होणार आहे.

सदरचे पोलीस मदत केंद्राचे उदघाटन कार्यक्रमावेळी मा.श्री.विशाल गायकवाड,पोलीस उप-आयुक्त सो,परिमंडळ-२,पिंपरी चिंचवड,श्री.सुनिल कुराडे,सहाय्यक पोलीस आयुक्त,वाकड विभाग,ॲम्बेसी टेक-झोन कंपनीचे पदाधिकारी तसेच परिसरातील विविध कंपन्या तसेच नागरिक उपस्थीत होते.

(विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-२
पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड